महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/069/2020/033 Dt. 25.01.2021

प्रति,
श्री. विकास शिवाजी सोनावणे,
बि. नं. ७, रूम नं. ११०३,
शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व),
मुंबई - ४०००५१.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २४.१२.२०२० रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. २४.१२.२०२० रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | दिनांक १९/०३/२०२० रोजी विकास सोनावणे यांनी म.वि.नि.आ. कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर आजपर्यंत कार्यालयात केलेल्या अंतिम कार्यवाहीची साक्षांकित प्रत मिळावी. (सोबत अर्जाच्या पहिल्या पानाची प्रत जोडली आहे). | याबाबत कार्यवाही सुरु आहे. अद्याप कार्यवाही पूर्ण न झाल्यामुळे आपणांस माहितीचा अधिकार अधिनियम कलम ८ (ज) नुसार माहिती उपलब्ध करून देता येत नाही. |
| २ | दिनाक ११/०४/२०१९ रोजी श्रीमती हेमलता मोती यांनी कार्यालयात सादर केलेल्या अर्जावर आजपर्यंत कार्यालयाने जी काही कार्यवाही केली आहे, त्याबाबतचे संपूर्ण कागदपत्रे साक्षांकित प्रतीमध्ये मिळावी. | कार्यालयाच्या अभिलेखानुसार आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे (एकूण पृष्ठे-१६) प्रती सोबत जोडल्या आहेत. |
| ३ | अवर सचिव अरूण वाळुंज यांची सन २०१८ रोजी कार्यालयातील चौकशीच्या संपूर्ण फाईलची टिपणी व चौकशी अहवालाची प्रत साक्षांकित प्रतीमध्ये मिळाव्यात, ही विनंती. | कार्यालयाच्या अभिलेखानुसार अवर सचिव यांची कार्यालयात चौकशी झालेली नसल्याने याबाबतची माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध नाही. |
| ४ | अरूण वाळुंज यांची कक्ष अधिकारी पदाच्या पदभर्तीचे तसेच कार्यालयातील निवड सूचीबाबतची संपूर्ण कागदपत्रे आणि पदोन्नतीच्या विषयक संपूर्ण कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. (सन २००९ ते आजतागायत) | कार्यालयाच्या अभिलेखानुसार आपणांस आवश्यक असलेली माहिती आयोगाच्या कार्यालयाकडे उपलब्ध आहे (एकूण पृष्ठे-९) प्रती सोबत जोडल्या आहेत. |

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४/ ६५/ ६९ Email: anilkumar.ukey@merc.gov.in

आपला विश्वासू,

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी